वेळ : 3 तास **नमूना कृतिपत्रिका - 2 (2022-23)** एकूण गुण : 80

**सुचना :** 1. सूचनेनुसार आकलकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात
2. आकृत्या पेनानचे काढाव्यात.
3. उजवीकडे अंक हे प्रश्नांसाठीचे पूर्ण गुण दर्शवितात.
4. नीटनेटकेपणा, स्वछता, लेखन यांकडे लक्ष दयावे.
5. उपयोजित लेखनातील कृतींसाठी आकृतीची आवश्यकता नाही.

## विभाग 1 : गदय

### पठीत गदय

**प्र. 1. (अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. पुढील संजाल पूर्ण करा :** 2

उता-यात आलेली पात्रे

( ) ( ) ( ) ( )

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्या कडे सुमित आला होता कानपूरहून. सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय. आय. टी. कानपूरला शिकत होता. काल संध्या-काळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवं प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. ''काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता?'' हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही बिचाऱ्या वरमल्या होत्या .

''अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ताबी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ?''

''सॉरी, मावशी खरंच सॉरी,'' आपण त्यांच्या मळकट पायांबद्दल बोललो याचं स्नेहललाही कसंतरी वाटलं. तिला टाचेला फाटलेली, अगदी पातळ झालेली त्यांची चप्पल आठवली. रेखामावशीच्या खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला. सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. तेवढ्यात पावडेकाकाही आले. आज बाबा आणि पावडेकाका कुठल्याशा कार्यक्रमाला जाणार होते. स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं. फरशी पुसणाऱ्या रेखामावशींचं लक्ष पावडेकाकांच्या तळव्याकडं गेलं. एकदम गोजिरा, गुलाबी तळवा. कुठं चिरण्या नाहीत की काही नाही! 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा', रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या . त्यांनी स्वत:च्या पायाकडं पाह्यलं... पायाला किती तरी चिरण्या पडल्या होत्या .. माती धूळ बसून त्या काळ्या पडल्या होत्या.

Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**2. आकृती पूर्ण करा :** 2

i) रेखामावशींच्या पावलांची वैशिष्ट्ये

[ ] [ ]

ii) पावडेकाकांच्या पावलांची वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| | |

**3. संगणक - काळाची गरज, याविषयी तुमचे मत लिहा.** **3**

**प्र. 1. (आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. हे केव्हा घडले ते लिहा :** **2**

i) लेखक घरात एका कोप-यात जाऊन रडत बसायचे .......

ii) लेखकांना हेवा वाटायचा .......

> माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्या एवढा होतो तेव्हा अगदी तुमच्या सारखाच खेळकर, खोडकर व उपद्व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्या बद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**2. प्रत्येकी एक उदाहरण लिहा :** **2**

i) बालपणीचा लेखकाचा खोडकरपणा -

ii) बालपणीचा लेखकाचा उपद्व्याप -

**3. तुमच्या मते लेखकाच्या मनात क्रिकेटचे बीज कसे रुजले असावे ते लिहा.** **3**

## <u>अपठीत गदय</u>

**प्र. 1. (इ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. खालील गोष्टींना लेखकांनी दिलेले महत्त्व लिहून चौकट पूर्ण करा :** **2**

i) राष्ट्र महान होण्यासाठी दोन महत्वाचे घटक - [ ]

ii) शिक्षकाची जबाबदारी अधिक महत्वाची का? [ ]

> कोणत्याही देशात शिक्षक व जवान हे महत्त्वपूर्ण घटक मानले जातात यांच्याशिवाय समाज सुरक्षित राहूच शकत नाही. दोघांची कार्ये जरी भिन्न असली तरी दोघेही समाजाचे रक्षणच करतात. एक देशाचे शत्रूपासून रक्षण करीत असतो तर दुसरा राष्ट्र समृद्ध करीत असतो; परंतु असे असले तरी शिक्षकाची जबावदारी जवानापेक्षा अधिक आहे. तो देशाचे भावी नागरिक तयार करीत असतो. शारीरिक, मानसिक व नैतिक विकास तो घडवीत असतो. त्यामुळेच राष्ट्र महान, श्रेष्ठ होते. त्यातूनच सैनिक तयार होतात. आमच्या शिक्षकांनी अहिंसक आंदोलनाच्या द्वारा हे सिद्ध करून दाखवले आहे की, सैनिकापेक्षा शिक्षक श्रेष्ठ आहे. आत्मिक बल हे अन्य कोणत्याही शस्त्रापेक्षा श्रेष्ठ आहे मोठे आहे. या आत्मिक बलाची महती जर सर्वांना समजली तर जगात शांतता नांदवयास वेळ लागणार नाही.

**2. 'शिक्षक एक आदर्श व्यक्तिमत्व' या विधानाबाबत तुमचे मत मांडा :** **2**

## विभाग 2 : पदय

**प्र. 2. (अ) पुढील पदयउतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. खालील चौकटी पूर्ण करा :** **2**

i) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी - ☐

ii) पिलांना सुरक्षितता देणारे - ☐

iii) चिरकाल टिकणारा आनंद - ☐

iv) व्यक्तीला सदैव सुख देणारा - ☐

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ॥
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्व काळ सुखदाता ॥
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ॥
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निववित सर्वेंद्रियां ॥
मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ॥
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ॥

Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**2. एका वाक्यात उत्तरे लिहा :** **2**

i) चकोर पक्ष्याबद्दल कोणती कल्पना आहे?

ii) योगी पुरूषाचे सर्वांशी वागणे कशा प्रकारे असते?

**3. योगीपुरूष व पाणी यांच्यातील फरक स्पष्ट करा :** 2

| योगीपुरूष | पाणी |
|---|---|
| | |

**4. 'जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।' या ओळीतून तुम्हाला समजलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा :** **2**

**प्र. 2. (आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेवर त्याखाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा :** **8**

**प्र. 2. (आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेवर त्याखाली दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा :** **8**

| मुद्दे | रंग मजेचे रंग उदयाचे किंवा | दोन दिवस |
|---|---|---|
| 1. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - | | |
| 2. प्रस्तुत कवितेचा विषय - | | |
| 3. प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा - | धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू<br>मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...<br>रंग मजेचे, रंग उदयाचे | हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले<br>कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले |
| 4. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - | | |
| 5. प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा - | I) ताटवे<br>ii) वृष्टी<br>iii) छत्र<br>iv) संगत | I) बरबाद<br>ii) डोईवर<br>iii) जिंदगी<br>iv) पोलाद |

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **6**

**1. 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, हे 'जगणं कॅक्टसचं' या पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.**

Genius FOUNDATION Institute

**2. खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**

व्युत्पत्ती कोश
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थ साहाय्य
- त्याचे प्रकाशन

**3. टीप लिहा : डॉ. होमी भाभा.**

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**1. पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** **2**

i) तुम्हांला त्रास होतोय का?

ii) किती गोंडस आहे तुमचे बाळ!

**2. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा :** **2**

i) किती पाऊस पडला हो काल रात्री! (विधानार्थी करा)

ii) आंदोलनात सामील व्हा. (प्रश्नार्थक वाक्य करा)

**3. पुढील कोणत्याही दोन वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :** **4**

i) झोकून देणे    ii) दिशा दाखवणे    iii) डोळे लावून बसणे

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**1. शब्दसंपत्ती :**

**i) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **1**

(1) निमंत्रण =    (2) कीव =

**ii) पुढील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(1) उशिरा x    (2) अमावस्या x

**iii) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.** **1**

गुरे राखणारा -

**iv) वचन बदला.** **1**

(1) बायका -    (2) पिशवी -

**2. पुढील वाक्ये लेखननियमांनुसार करा :** **2**

i) आजची परिक्षा पद्धती काळबाहये झाली आहे.

ii) कालाच्या प्रवाहाबरोबर जाणे हाच खरा मारग.

**3. पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा :** **2**

i) "समजा, घरातून बाहेर पडताना कुणी विचारले, "कुठे जाता?" मी काय सांगू.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा :**

**1. पत्रलेखन :** **6**

*** साखळीचोरांपासून सावधान ***
सकाळच्या वेळी फिरायला स्त्रियांनी आपले दागिने सांभाळा.
बाइकस्वारापासून स्वत:ला जपा. अमर सामंत, अध्यक्ष,
संकल्प सोसायटी, एम. जी. रोड, गोरेगाव (प) मुंबई.

आपल्या विभागातील वरिष्ठ पोलीस अधिका-यांना चोरांचा उपद्रव थांबविण्याविषयी विनंती पत्र लिहा.

**किंवा**

साखळी चोरांस पकडून दिल्याबद्दल आपल्या मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

**2. सारांशलेखन : खालील उता-याचा एक तृतीयांश सारांश लिहा :** **6**

रमणमहर्षींनी आपल्या प्रेमाने केवळ दूरच्या आणि जवळच्या भक्तांनाच नव्हे तर पशुपक्षांनादेखील आपल्याकडे आकर्षून घेतले. त्यांचा आश्रम म्हणजे कुत्री, गाई, माकडे, खारी, मोर व इतर पशुपक्षांचे घरच बनले होते. दर्शनासाठी व कृपाप्रसादा-साठी त्यांच्याकडे येणा-या लोकांइतकेच या प्राण्यांकडेही ते लक्ष देत असत. त्यांच्यावर प्रेम करीत असत. सर्व पशुपक्षांना ते

माणसांप्रमाणे वागवित. 'आज मुले जेवली का?' अशी कु यांविषयी ते विचारपूस करीत. जेवणाच्या वेळी प्रथम कुत्र्यांना, नंतर भिका-यांना व सर्वांत शेवटी भक्तांना जेवण दिले जाई. तसाच आश्रमाचा दंडक होता. एकदा वानरी महर्षींकडे आपले पिलू घेऊन आली. शांततेचा भंग होऊ लागल्याने भक्त तिला हाकलून देऊ लागले. पण महर्षी म्हणाले, 'येऊ दया तिला. अडवू नका. ती आपले तान्हुले दाखविण्यासाठी माझ्याकडे आली आहे. तुमच्याप्रमाणेच तिलाही माझे आशीर्वाद हवे आहेत.'

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :**

**1. जाहिरातलेखन : (50 ते 60 शब्द)** **5**

**पुढील माहिती वाचून आकर्षक जाहिरात तयार करा.**

सहालीसाठी जाणा या कंपनीची जाहिरात खालील मुद्दयांच्या आधारे तयार करा.

* कंपनीचे नाव   * कंपनीचे वैशिष्टये   * विशिष्ट आकर्षण   * पत्ता

**2. बातमीलेखन : (50 ते 60 शब्द)** **5**

**खालील विषयावर बातमी तयार करा :**

**आधार निवास**
समता नगर, नाशिक
जागतिक वृद्ध दिनानिमित्त विशेष
सांस्कृतिक कार्यक्रम
गायन, वादन, कथाकथन
सादरकर्ते - रसिक मित्रमंडळ, नाशिक
मोफत प्रवेश
सर्वांना सस्नेह निमंत्रण

**1** ऑक्टोबर

संध्याकाळी **5** ते **7**

व्यवस्थापक

वृद्ध दिनानिमित्त संपन्न झालेल्या वरील कार्यक्रमाची बातमी तयार करून लिहा.

**3. कथालेखन : (80 ते 90 शब्द)** **5**

**पुढील मुद्दयांच्या आधारे एक कथा तयार करा कथेला योग्य शीर्षक द्या.**

**मुद्दे** : दोन बोके --- लोण्याचा गोळा मिळणे --- वाटणीवरून भांडण --- माकडाचे तराजू घेऊन येणे --- वाटणी करून देण्याच्या निमित्ताने स्वत:च लोणी खाणे --- दोघांच्या भांडणात तिस-याचा लाभ.

**प्र. 5. (इ) पुढीलपैकी कोणतीही एका विषयावर निबंधलेखन करा : (100 ते 120 शब्द)** **8**

**1. प्रसंगलेखन :**

'दिव्यदृष्टी अंध विदयालय' कोल्हापूर
'वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा'
दि. **24** डिसेंबर
'अंध विदयार्थ्यांचा अनुपम
कलाविष्कार सोहळा'

● वादयवादन   ● गायन   ● नृत्य

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

## 2. आत्मकथन :

शेतक-याचे आत्मकथन

मुद्दे ः मी एक शेतकरी - जन्म व बालपण - गरीब परिस्थिती - शिक्षण नाही - शेतात घाम गाळणे - कमी उत्पन्न - जीवन निसर्गावर अवलंबून - शेतात नवीन प्रयोग - बदल होणे - उत्पन्नात वाढ - मुलांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न - समाज व सरकारकडून अपेक्षा

## 3. वैचारिक :

यंत्र आमचा मित्र की शत्रू ?

**मुद्दे :**

| |
|---|
| यंत्राचा उपयोग अटळ |
| यंत्राचा शोध लागल्याने बेकारी वाढली |
| उत्पादन वाढले |
| विकास होतो |
| क्षमता |
| चांगल्यासाठीच उपयोग, मित्र |

| |
|---|
| दोन्ही बाजूंनी भिन्न विचारसरणी |
| अपघातांचे खरे कारण |
| यंत्र आमचा मित्रच |
| नव्या युगात यंत्रशक्ती महत्वाची |
| उपयोग कसा करावा आपल्या हाती |
| नाशासाठी उपयोग, शत्रू |

Genius
JEE NEET CET FOUNDATION Institute